# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.08.2025** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फिलिपिन्सचे अध्यक्ष फर्डिनांड रोमुआल्देझ मार्कोस ज्युनिअर यांच्यात आज शिष्टमंडळस्तरीय चर्चा.
2. राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एनडीएच्या संसदीय मंडळाची आज सकाळी महत्त्वाची बैठक.
3. रशियाकडून तेल आयातीबाबत अमेरिका आणि युरोपीय महासंघानं भारताला लक्ष्य करणं अनुचित आणि तर्कहीन असल्याचं भारताचं स्पष्टीकरण.
4. परीक्षा पे चर्चा उपक्रमाला गिनेसच्या जागतिक विक्रमांच्या यादीत स्थान आणि
5. ओवल क्रिकेट कसोटीत भारताचा इंग्लंडवर रोमहर्षक विजय, मालिकेत बरोबरी

**<u>भारत-फिलिपिन्स</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फिलिपिन्सचे अध्यक्ष फर्डिनांड रोमुआल्देझ मार्कोस ज्युनिअर यांच्यात शिष्टमंडळस्तरीय चर्चा आज होणार आहे. मार्कोस सध्या भारताच्या पाच दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. उभय नेत्यांमधल्या चर्चेमुळे द्विपक्षीय संबंध दृढ होतील, असा विश्वास परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी व्यक्त केला आहे. मोदी आणि मार्कोस यांच्या उपस्थितीत आज अनेक संयुक्त सहकार्य करारांवरही स्वाक्षऱ्या केल्या जाणार आहेत. व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण, सागरी सहकार्य, कृषी, औषधनिर्माण अशा विविध मुद्यांचा आढावा आजच्या चर्चेत घेतला जाणार आहे.

**<u>एनडीए बैठक</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एनडीएच्या संसदीय मंडळाची आज सकाळी महत्त्वाची बैठक होणार आहे. एनडीएचे लोकसभा आणि राज्यसभेचे सदस्य या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी या बैठकीमध्ये मार्गदर्शन करणार आहेत. बिहारमध्ये मतदारयाद्या पुनरीक्षण मागं घेण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली असून, त्याबाबत चर्चा घेण्यासाठी ते संसदेत गोंधळ करत असल्याच्या पार्श्वभूमीवर एनडीएनं ही बैठक आयोजित केली आहे. विरोधी पक्षांच्या गोंधळामुळे राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक 2025 आणि राष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी सुधारणा विधेयक 2025 लोकसभेत चर्चेसाठी येऊ शकलेलं नाही. विरोधी पक्षांनी सभागृहाचा वेळ वाया घालवू नये असं आवाहन संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केलं आहे आणि त्यांच्या भूमिकेचा निषेध केला आहे. ही विधेयकं महत्त्वाची असून विरोधी पक्षांनी चर्चा होऊ द्यावी असं आवाहन केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनीही केलं आहे.

**<u>परीक्षा पे चर्चा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या परीक्षा पे चर्चा या उपक्रमाला गिनेसच्या जागतिक विक्रमांच्या यादीत स्थान मिळालं आहे. 'नागरिकांचा सहभाग असलेल्या ऑनलाइन प्रणालीवर एका महिन्यात सर्वाधिक नोंदणी' असा जागतिक विक्रम परीक्षा पे चर्चानं केला आहे. माय गव्ह या प्रणालीवर परीक्षा पे चर्चाच्या आठव्या भागासाठी तीन कोटी 53 लाख नागरिकांनी नोंदणी केली होती. त्याची दखल घेऊन गिनेसनं जागतिक विक्रमांच्या यादीत नोंद केली आहे. या जागतिक विक्रमाबाबतचं अधिकृत प्रमाणपत्र नवी दिल्लीत काल प्रदान करण्यात आलं. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, रेल्वे आणि माहिती आणि प्रसारण मंत्री आश्विनी वैष्णव या कार्यक्रमाला उपस्थित होते. परीक्षा पे चर्चा हा विशेष उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केला आहे. त्यात पंतप्रधान थेट विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधतात.

**भारत स्पष्टीकरण**

रशियाकडून तेल आयातीबाबत अमेरिका आणि युरोपीय महासंघानं भारताला लक्ष्य करणं अनुचित आणि तर्कहीन असल्याचं भारतानं म्हटलं आहे. कोणत्याही महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांसारखांच भारतही आपल्या राष्ट्रीय हिताचं आणि आर्थिक स्थैर्याचं  संरक्षण करेल, असं ठाम प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं केलं आहे. रशिया आणि युक्रेन संघर्षानंतर सर्व पारंपरिक पुरवठा युरोपाकडे वळल्यामुळे भारतानं रशियाकडून कच्चं तेल आयात करणं सुरू केल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. त्या वेळी अमेरिकेनंच अशा आयातीला प्रोत्साहन दिल्याचंही या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. तत्कालीन जागतिक बाजारपेठेतल्या परिस्थितीमुळे भारतीय ग्राहकांना रास्त दरात इंधन पुरवठा व्हावा असा त्यावेळी हेतू होता. मात्र, भारतावर टीका करणारे देशच रशियाशी व्यापार करत असल्याचं स्पष्ट झालं आहे असंही भारतानं म्हटलं आहे. अमेरिका आणि युरोपीय महासंघ रशियाबरोबर करत असलेल्या व्यापाराचे दाखलेही भारतानं दिले आहेत. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्याबरोबर हंगामी व्यापार करार झाल्यामुळे युरोपीय महासंघानं अमेरिकेतल्या उत्पादनांवरचं वाढीव आयातशुल्क स्थगित केलं आहे.

**कर्तव्य भवन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं कर्तव्य पथावरील कर्तव्य भवनाचं उद्घाटन करणार आहेत. यावेळी होणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रमात पंतप्रधान संबोधित करणार आहेत. कर्तव्य भवन हा सेंट्रल व्हिस्टाच्या माध्यमातून घडविलेल्या व्यापक परिवर्तनाचा एक भाग आहे. प्रशासनिक प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी आणि गतिमान प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी सामान्य केंद्रीय सचिवालय इमारती उभारण्याची सरकारची योजना असून त्यापैकी कर्तव्य भवन ही पहिली इमारत आहे. विविध मंत्रालयं आणि विभाग सध्या दिल्लीमध्ये विखुरलेलया स्वरूपात असून त्यामुळे कामं पूर्ण करण्यात अडथळे येतात आणि त्याला विलंबही होतो. त्यामुळे हे विभाग आणि मंत्रालयं एका ठिकाणी आणण्यात आली आहेत. कर्तव्य भवन हे दोन भूमिगत मजले आणि सात स्तरांमध्ये सुमारे दीड लाख चौरस मीटरच्या क्षेत्रफळात विस्तारलेलं एक आधुनिक अमेरिकन पद्धतीचं कार्यालय आहे.

**भारत विमानवाहतूक**

भारतानं विमानवाहतूक क्षेत्रात जगात पाचवा क्रमांक मिळवला आहे. भारतात 2024 मध्ये एकंदर 24 कोटी 10 लाख प्रवाशांची नोंद झाली असून, मुंबई-दिल्ली ही विमानतळ जोडी जगातल्या सर्वांत व्यग्र विमानतळांच्या जोडीपैकी एक ठरली आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ वाहतूक संघटना म्हणजे आयएटीएनं 2024 चा जागतिक विमानवाहतुकीबाबतचा आकडेवारी अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यातून ही आकडेवारी समोर आली आहे. अमेरिका या यादीत सर्वोच्च स्थानावर असून, त्या देशात 87 कोटी साठ लाख प्रवाशांची नोंद झाली आहे. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनमध्ये 74 कोटी 10 लाख, तिसऱ्या क्रमांकावरच्या ब्रिटनमध्ये 26 कोटी, तर चौथ्या क्रमांकावरच्या स्पेनमध्ये 24 कोटी दहा लाख प्रवाशांची नोंद झाली आहे.

**राहुल गांधी**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 2020 मधे गलवान खोरे इथं चीनसोबत झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराबाबत केलेल्या कथित अपमानास्पद वक्तव्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली आहे. एक खरा भारतीय असे प्रश्न उपस्थित करणार नाही असं सांगून, विरोधी पक्षनेते म्हणून गांधी यांनी असे मुद्दे समाजमाध्यमांवर न मांडता लोकसभेत मांडावेत, असं न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि ए जी मसीह यांच्या पीठाने सांगितलं.

**नौका दुर्घटना**

येमेनच्या दक्षिण किनाऱ्यालगत बहुतांश इथियोपियन स्थलांतरितांना घेऊन जाणारी एक नौका बुडल्यामुळे घडलेल्या दुर्घटनेतील मृतांची संख्या आता 76 पर्यंत वाढली  आहे. येमेनच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे जहाज आदेनच्या आखातात आब्यान प्रांताजवळ बुडालं. अधिकाऱ्यांनी काल 76 मृतदेह सापडल्याच्या माहितीला दुजोरा दिला असून आतापर्यंत 32 लोकांचे जीव वाचवण्यात आल्याचं  सांगितलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय स्थलांतरित संघटनेच्या

माहितीनुसार, या नौकेत 157 लोक होते. बेपत्ता लोकांच्या शोध घेण्याचं काम अजून सुरू असल्याचं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

**<u>शिबू सोरेन-अंत्यसंस्कार</u>**

माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांच्या पार्थिव देहावर आज अंत्यसंस्कार होणार आहेत. झारखंडमधील त्यांचं गाव नेमरा इथं अंत्यसंस्कार होणार आहेत. सोरेन यांचं काल नवी दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात निधन झालं, ते 81 वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंडविकारावर उपचार घेत होते.

**<u>मुष्टियुद्ध</u>**

थायलंडमध्ये बँकॉक इथं सुरू असलेल्या 22 वर्षांखालील आशियाई विजेतेपदाच्या उपांत्य फेरीमध्ये सहा भारतीय मुष्टियुद्धपटूंना विजय मिळाला असून त्यामुळे भारताच्या खात्यामध्ये एकूण आठ पदके आली आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

अँडरसन- तेंडुलकर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात भारतानं इंग्लंडवर सहा धावांनी रोमहर्षक विजय मिळवत ही मालिका 2-2 अशी बरोबरीत सोडण्यात यश मिळवलं. विजयासाठी 374 धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या इंग्लंडचा दुसरा डाव 367 धावात आटोपला. अखेरच्या दिवशी विजयासाठी इंग्लंडला केवळ 35 धावांची गरज असताना मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी भेदक गोलंदाजी करत यजमानांकडून विजय अक्षरशः खेचून आणला. सामन्यात नऊ बळी घेणारा सिराज सामनावीर ठरला. अनेक नवखे खेळाडू असलेल्या भारतीय संघानं केवळ सहा धावांनी मिळावलेला हा रोमहर्षक विजय कसोटी क्रिकेटच्या इतिहासातला एक विक्रमच ठरला आहे. कर्णधारपदाच्या आपल्या पहिल्याच मालिकेत सर्वाधिक 754 धावा करणारा शुभमन गिल आणि इंग्लंडचा हॅरी ब्रूक यांना मालिकावीर घोषित करण्यात आलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.